# किरकोळ दिवाणी अर्ज नं. ६६/२०१४ मधील निशाणी २९ वरील आदेश

(श्री. राजाराम नाईक वि. तानाजी बनसोडे)

प्रस्तुतचा अर्ज दिनांक १०.०१.२०२० रोजी प्रस्तुत जाबदार यांनी अर्जदार यांचा उलटतपास न घेतल्याने त्यांच्याविरुध्द ''उलटतपास नाही''असा झालेला आदेश रद्द होऊन उलटतपास घेणेस परवानगी मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. जाबदारच्या कथनानुसार, प्रस्तुतचे प्रकरण हे मे. कोर्टाच्या आदेशाचा अवमान केलेबाबत असल्याने याकामी जाबदार यांना अर्जदारांचा सविस्तर उलटतपास घेणे जरुरीचे आहे. त्यामुळे दिनांक १०.०१.२०२० रोजी जाबदार यांच्याविरुध्दचा उलटतपास नाही असा झालेला आदेश रद्द होऊन, अर्जदार यांचा उलटतपास घेणेस परवानगी मिळावी, अशी विनंती केली आहे.

३. सदर अर्जास अर्जदारतर्फे आक्षेप नोंदविणेत येऊन जाबदार यांची अर्जात नमूद केलेली कथने व कृती पहाता अर्जात नमूद मिळकतीविषयी जाबदार सातत्याने मे. कोर्ट आदेशाचा अवमान करण्याची कृती करीत आहे व काम चालविणेस वेळकाढूपणाचे धोरण स्वीकारीत आहे. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज खर्चासहित रद्द करणेत यावा, अशी विनंती केली आहे.

४. जाबदारचा अर्ज, त्यावरील म्हणणे व अभिलेखावरील कागदपत्रे पाहिली. जाबदार व अर्जदारतर्फे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

**५.** अर्जाचे स्वरुप व जाबदार यांनी अर्जात नमुद केलेली हकीकत लक्षात घेता माझ्या मते अर्जाचा गुणदोषावर अंतिम निर्णय होणेसाठी जाबदार यांनी दिनांक १०.०१.२०२० रोजी अर्जदारचा ''उलटतपास नाही''असा झालेला आदेश रद्द होऊन अर्जदारचा उलटतपास घेणे आवश्यक आहे. त्यामुळे माझ्या मते अर्जदारचे कोणतेही नुकसान होणार नाही. त्यामुळे प्रस्तुत जाबदार यांच्याविरुध्द ''उलटतपास नाही''असा झालेला आदेश रद्द करण्यात येत आहे आणि जाबदारास अर्जदाराचा उलटतपास घेण्याची संधी देण्यात येते. खर्चाविषयी आदेश नाही.

Uday Mahadev Jadhav

Digitally signed by Uday Mahadev Jadhav
Date: 2022.02.09 12:02:12 +0530

ठिकाण –मिरज. (यु. एम. जाधव )

दिनांक – ०८.०२.२०२२. चौथे सहदिवाणी न्यायाधीश, क.स्तर, मिरज.

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | Mr. S. S. Shingana |
| Name of Court | :- | Mr. Uday Mahadev Jadhav,<br>4th Jt. Civil Judge (J.D.) and Judicial Magistrate First Class, Miraj, Dist.Sangli. |
| Date of decision / typed | :- | 08.02.2022. |
| Judgment/order signed by the P.O. on | :- | 08.02.2022. |
| Judgment/order uploaded on | :- | 08.02.2022. |